**ठळक बातम्या**

- सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात आजपासून वाढ
- नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण
- सीबीएसई बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण
- पुद्दुचेरीत एन. रंगासामी यांनी घेतली मुख्यमंत्री पदाची शपथ

**आणि**

- सांगली जिल्ह्यात मरगुबाई यात्रेदरम्यान सहा भाविकांचा मृत्यू, प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

**<><><><><>**

केंद्र सरकारने सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात वाढ केली असून, ही वाढ आजपासून लागू झाली. अर्थ मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली. सोने आणि चांदी या धातूंवर ५ टक्के शुल्क आकारलं जाईल, तर प्लॅटिनमच्या काही घटकांसाठी ५ पूर्णांक ४ दशांश टक्के शुल्क लागू होईल. परकीय चलन वाचवण्यासाठी इतर उपाययोजनांबरोबरच सामाजिक कल्याण अधिभार तसंच पायाभूत सुविधा आणि कृषी अधिभार वाढवल्याचं अर्थमंत्रालयाने जाहीर केलेल्या या निवेदनात म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सोनेखरेदी टाळण्याचं आव्हान केलं होतं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इंधनाचा वापर नियंत्रित करण्याचं आवाहन केलं होतं, त्या आवाहनानुसार प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या देशांतर्गत दौऱ्यांसाठीच्या ताफ्यात कपात केली आहे. विशेष सुरक्षा दलाच्या कार्यपद्धती नुसार ताफ्यातली अत्यावश्यक सुरक्षा अबाधित ठेवण्यात आली असून सुरक्षा दलातली अवांतर वाहनं कमी करण्यात आली आहेत. गृहमंत्री अमित शहा यांनी देखील त्यांचा सुरक्षा यंत्रणेचा ताफा निम्म्याहुन अधिक कमी केला आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज एक बैठक घेणार आहेत. या बैठकीत मंत्र्यांच्या ताफ्यातल्या वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याबाबत चर्चा होईल. आज सकाळीही याबाबत एक बैठक झाली.

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं अनावरण केलं. त्रिशूळ, त्र्यंबकेश्वर मंदिर आणि गोदावरी नदी यांचं दर्शन घडवणारं हे बोधचिन्ह सांस्कृतिक वारसा, भारतीय परंपरा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे देणारे असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

खासगी प्रवासी बस वाहतूकदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक दूर करण्यासह, दीर्घकालीन उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य सरकारनं विशेष समिती स्थापन केली आहे. ही समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग ॲप्सना आळा घालणे, प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची राज्य सरकारकडून प्रभावी आणि तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असं आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिलं.

<><><><><>

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज बारावीच्या परीक्षेचे निकाल जाहीर केले. त्यात ८५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी पास झाले असले तरी गेल्यावर्षीच्या तुलनेत निकालात घट झाली आहे. मुलींपेक्षा पास होण्याचे प्रमाण ८८ टक्के तर मुलांमध्ये हे प्रमाण ८२ टक्के आहे. यंदा १७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ९५ टक्के पेक्षा जास्त तर ९४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

<><><><><>

पुद्दुचेरीत ऑल इंडिया एनआर काँग्रेस नेते एन. रंगासामी यांनी आज मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पुद्दुचेरीचे राज्यपाल के. कैलाशनाथन यांनी, पुद्दुचेरीच्या लोकनिवासमध्ये

रंगासामी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. काँग्रेसचे मलाडीकृष्ण राव आणि भाजपाचे एन नमस्सि-वायम यांनीही यावेळी मंत्रीपदाची शपथ घेतली. रंगासामी यांची पाचव्यांदा मुख्यमंत्री म्हणून निवड झाली आहे. शपथविधीच्या वेळी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन, राष्ट्रीय सरचिटणीस बी.एल, संतोष उपस्थित होते.

<><><><><>

तामिळनाडू विधानसभेत मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके म्हणजेच तमिळगा वेत्री कळघम पक्षाने मांडलेल्या विश्वासदर्शक ठरावाला त्यांच्या मित्रपक्षाबरोबरच अण्णा द्रमुकच्या एका गटाने आणि अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघममधून निलंबित केलेले आमदार एस. कामराज यांनी पाठिंबा दिला. ठरावाला १४४ आमदारांनी पाठिंबा दिला, २२ जणांनी विरोधात मत दिलं तर ५ जण तटस्थ राहिले. द्रमुकच्या आमदारांनी सभात्याग केला. तामिळनाडू विधानसभेत ११८ जणांचं पाठबळ आवश्यक असताना आता टीव्हीकेकडे १४४ जणांचं बहुमत आहे.

<><><><><>

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील मोटेवाडी आसंगी तुर्क इथल्या मरगुबाई यात्रेदरम्यान काल सहा भाविकांचा मृत्यू झाला. अचानक आलेल्या पावसामुळे हे भाविक भिंतीच्या आडोशाला बसले असता भिंत कोसळून हा अपघात झाला. भाविकांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

या यात्रेसाठी ३०० हून अधिक भाविक आले होते. यावेळी अचानक आलेल्या पावसापासून बचाव करण्यासाठी काही भाविक एका भिंतीच्या आडोशाला बसले असताना आलेल्या जोरदार वाऱ्याने भिंतीवरचे पत्रे उडाले आणि भिंत कोसळली. यामध्ये ६ भाविकांचा मृत्यू झाला तर २० भाविक जखमी झाले. मृतांमधले तीन भाविक हे जत तालुक्यातले तर तीनजण कर्नाटकातले होते. जखमींना जत, सांगली आणि कर्नाटकातल्या विजापूर इथं दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या कथित प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सीबीआयचं पथक जयपूरमध्ये दाखल झालं आहे. राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलानं ताब्यात

घेतलेल्या सुमारे दोन डझन संशयितांची सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे. दरम्यान, राजस्थान पोलिसांनी या प्रकरणा संदर्भात परिसरातल्या शंभर पेक्षा अधिक लोकांची चौकशी केली आहे.

**<><><><><>**

नाशिक धुळे राष्ट्रीय महामार्गावर आज सकाळी झालेल्या बस अपघातात चालकासह १३ जण जखमी झाले. उमराणे गाव ओलांडल्यावर बसच्या चालकाची प्रकृती अचानक बिघडली. त्यामुळे नियंत्रण सुटल्याने बस झाडावर आदळून हा अपघात झाला.

**<><><><><>**

समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंग यादव यांचा धाकटा मुलगा प्रतिक यादव यांचं आज आकस्मिक निधन झालं. त्यांना उपचारासाठी लखनौच्या शहर रुग्णालयात आणलं असता त्यांचं निधन झाल्याचं घोषित करण्यात आलं. शवविच्छेदनानंतर त्यांच्या मृत्यूचं कारण समजेल असं रुग्णालयाने म्हटलं आहे. ते ३८ वर्षाचे होते. प्रतिक यादव यांची पत्नी अपर्णा बिश्त यादव या भाजपा सदस्य असून राज्य महिला आयोगाच्या उपाध्यक्ष आहेत. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रतिक यादव यांच्या आकस्मिक निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार आहे. न्यू रायपूर इथे शहीद वीर नारायण सिंग मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

हवामान विभागानं अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. या जिल्ह्यांमध्ये वादळी वारे, गारपीट होण्याची शक्यता आहे. दक्षिण, पश्चिम महाराष्ट्र तसंच नांदेड, लातूर, धाराशिवमध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचीही शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान उष्ण राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**